MHKO100005552010

## रे.क.नं. १७५/२०१० मधील निशाणी क्र. १३१ वरील आदेश

(बाबू शिंदे वि. सदाशिव शिंदे)

**१.** वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.७अ श्रीमती सोनाबाई नारायण शिंदे यांचे वारस रेकॉर्डवर आणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ७अ ही तिचे अन्य वारसांसह गडहिंग्लज येथे राहण्यास होती त्यामुळे ती मयत झाल्याचे वादी यांना समजून आले नाही. प्रतिवादी क्र. ७अ च्या मृत्यूबाबत त्यांना अलिकडेच माहिती मिळाली आहे. वादी यांनी जाणूनबुजून प्रतिवादी क्र. ७अ वारस रेकॉर्डवर आणण्यास टाळाटाळ केलेली नाही. प्रस्तुतचा वाद हा स्थावर मिळकती संदर्भातील आहे. सबब प्रतिवादी क्र.७अ यांचे वारस रेकॉर्डवर आणण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**३.** प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे कथन आहे की, वादी यांनी जाणूनबुजून वारस रेकॉर्डवर घेण्यास टाळाटाळ केलेली आहे. प्रस्तुतचा अर्ज हा पाच वर्षानंतर दाखल केल्यामुळे नामंजूर करण्यात यावा. वारस रेकॉर्डवर आण्यास वादीने विलंब केल्यामुळे त्यांचेवर जास्तीत जास्त कॉस्ट करण्यात यावी.

**४.** वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे दावा वाटपाकरीता व कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. अभिलेखाची पाहणी केली असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.७अ सोनाबाई नारायण

शिंदे ही दिनांक ०५/०९/२०२० रोजी मयत झाली असून त्यांचे वारस रेकॉर्डवर आणण्यास वादी यांना विलंब झाला आहे. प्रतिवादी क्र.७अ यांचे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. त्यामुळे वादी यांना प्रतिवादी क्र. ७अ सोनाबाई नारायण शिंदे यांचे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. ७अ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत असल्यामुळे वादी यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१ वादी यांचा अर्ज प्रतिवादी यांना रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) खर्चादाखल देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.03.07 11:25:36 +0530

ठिकाण — गडहिंग्लज
दिनांक ०६/०३/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज